| | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | १६/०४/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | १६/०४/२०२५ |
| | निर्णय दिनांक | २१/०४/२०२६ |
| | कालावधी – ०१ **व.** ०० **म.** ०५ **दि.** | |
| MHSN040003182025 | **निशाणी क्रमांकः— २३.** | |

**जिल्हा न्यायाधीश क्र.१, इस्लामपूर, जिल्हा सांगली यांचे न्यायालयात,**
(पिठासीन अधिकारी श्री. देविदास हरी केळूसकर)

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४/२०२५**

श्री. अनिल विलास चौगुले **अर्जदार**
वय– ३३ वर्षे, धंदा– नोकरी,
रा. कृष्णा कोयना चाळ, महाराष्ट्रनगर,
मानखुर्द, मुंबई
सध्या रा. द्वारा रेखा चंद्रकांत शिंदे,
पोलीस स्टेशनजवळ, आष्टा,
ता. वाळवा, जि. सांगली.

**विरुध्द**

१. सौ. सोनम अनिल चौगुले **जाबदार**
सौ. सोनाली अरुण शेळके
वय– २८ वर्षे, धंदा– घरकाम

२. कु. मानव अनिल चौगुले
वय– ५ वर्षे, धंदा– शिक्षण
अ.पा.क. आई अर्जदार नं. १,
सर्व रा. द्वारा अरुण अधिक शेळके
मु.पो. ३२ शिराळा, डवरी वसाहत,
ता. शिराळा, जि. सांगली.

DEVIDAS HARI KELUSKAR

Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.04.21 15:59:23 +0530

---

अर्जदारसाठी वकील – श्रीमती एस. टी. फाळके
जाबदार – एकतर्फा

---

**न्यायनिर्णय**
**(दिनांक २१/०४/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी पालक आणि पालकत्व कायदा (The Guardians and Wards Act) कलम २५ प्रमाणे अर्जदार व जाबदार यांचा मुलगा मानव याचा जाबदारकडून कायमचा ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे.

अर्जदार व जाबदार नं.१ यांचा विवाह दिनांक २६/०६/२०१९ रोजी हिंदू धर्म रितीरिवाजाप्रमाणे बोरगांव, जि. सातारा येथे झाला व सदर लग्नसंबंधातून जाबदार नं. २ मानव हा मुलगा झाला आहे. अर्जदार हे नोकरीनिमित्त मुंबई येथे राहत होते परंतु कोरोना महामारीपासून ते गावी आष्टा येथे आईवडील व बहिणीसोबत राहण्यास आहेत. लग्नानंतर सुरुवातीचे वर्षभर जाबदार नं. १ यानी व्यवस्थित संसार केला. परंतु, त्यानंतर जाबदार नं.१ या वेगवेगळया कारणावरुन भांडण करु लागल्या. जाबदार नं.१ वारंवार पैशाची मागणी करीत होत्या. दिनांक २३/०४/२०२० रोजी मुलगा मानव याचा जन्म झाला त्यावेळी अर्जदार व त्याचे वडील भेटण्यासाठी गेले असता जाबदार नं.१ चे वडीलांनी अपमानास्पद वागणूक दिली व अर्जदारला शिवीगाळ केली. सन २०२२ मध्ये अर्जदारने मध्यस्थांमार्फत जाबदार नं.१ व २ यांना घरी घेऊन

जाण्याचा प्रयत्न केला, परंतु जाबदार नं. १ चे वडीलांनी जाबदार नं. १ चे दुसरे लग्न लावून दिल्याचे अर्जदारला समजले. अर्जदारची संमत्ती अथवा घटस्फोट न घेताच जाबदार नं. १ ने दुसरा विवाह केला आहे व अर्जदारला वैवाहिक जीवनापासून व मानवच्या प्रेमापासून वंचित ठेवले आहे.

३. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारचे आईला आपल्या नातवाच्या विरहाने बी.पी.चा त्रास चालू झाला आहे. अर्जदार व त्याचे घरातील लोकांना जाबदार नं. २ ची सतत काळजी वाटत आहे. अर्जदार हे जाबदार नं. २ यास योग्य शिक्षण देवू शकतात व त्याच्या हातावर उपचार व इतर औषधोपचार व्यवस्थीतपणे करु शकतात. अर्जदार हे शहरामध्ये राहत असलेने जाबदार नं. २ च्या सर्व मुलभूत गरजा पुर्ण करु शकतात. तसेच जाबदार नं. १ यांनी दुसरे लग्न करुन दोन मुलांच्या आई आहेत. त्यांचे सर्व जीवन दुसरे पतीवर अवलंबून आहे. त्यामुळे जाबदार नं. १ या अर्थिक, शारिरीक व मानसिकदृष्टया कमकुवत असल्याने जाबदार नं. २ चा सांभाळ व्यवस्थित करु शकणार नाहीत. त्यामुळे जाबदार नं. २ च्या उज्वल भवितव्यासाठी व सर्वांगीण प्रगतीसाठी त्याचा कायमचा ताबा मिळावा अशी अर्जदारने मागणी केली आहे.

४. जाबदार यांना निशाणी ६ व ७ प्रमाणे अर्जाची बजावणी होऊन देखील ते याकामी हजर न राहिल्याने अर्जाची सुनावणी एकतर्फा करण्याबाबत निशाणी १ वर आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर अर्जदारने त्याचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक ११/०९/२०२५ रोजी दाखल केले. त्यादिवशी जाबदार हे गैरहजर असल्याने जाबदार नं. १

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.04.21 15:59:31 +0530

जाबदार नं. २ याला न्यायालयात हजर ठेवण्याबाबत आदेश पारीत करण्यात आला. सदर आदेशाप्रमाणे पुन्हा जाबदार यांना नोटीस काढण्यात आली. परंतु, ते गैरहजर राहिले.

५. त्यानंतर अर्जदारतर्फे साक्षीदार संजय लक्ष्मण शिंदे याचे शपथपत्र दाखल करण्यात आले. अर्जदार व त्याच्या साक्षीदाराच्या कथनानुसार जाबदार हिने दुसरे लग्न केले आहे व सदर लग्नसंबंधातून तिला मुलेही झाली आहेत. साक्षीदार संजय शिंदे याच्या कथनानुसार जाबदार नं. १ हिचा दुसरा विवाह अरुण शेळके रा. शिराळा या इसमाबरोबर झाला आहे व सदर दुस–या विवाहापासून जाबदार नं. १ हिला दोन अपत्ये आहेत. दिनांक २५/०३/२०२६ रोजी साक्षीदार नं. २ हा न्यायालयात हजर होता. त्यास जाबदार याच्या दुस–या लग्नासंदर्भात व तिच्या मुलांबाबत न्यायालयामार्फत माहित असण्याचे कारण काय असे विचारले असता सदर व्यक्ती ही त्याची परिचयाची व नातेसबंधातील असल्याचे सांगितले.

६. जाबदार हिला सदर अर्जाच्या तसेच अर्जदार याने शपथपत्र दाखल केल्यानंतर जाबदार नं. २ यास न्यायालयात हजर ठेवण्याबाबत आदेश देवूनही व सदर आदेशाची जाबदार नं. १ हिचे वर बजावणी होऊन देखील जाबदार नं. १ ही न्यायालयात हजर राहिली नाही व त्याबाबत कोणतेही म्हणणेही दिले नाही. जाबदार नं. २ यास न्यायालयात हजर न ठेवल्याने त्याचे मत जाणून घेण्याची संधी प्राप्त झाली नाही.

निशाणी १० व ११ वरील बेलिफ अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अरुण अधिक शेळके यांच्या घरचा सदर पत्ता आहे. पहिल्यांदा जाबदार नं. १ यांची नणंद लतिका अधिक शेळके हिने सांगितले की, जाबदार हि मुलाला घेऊन दवाखान्यात गेली आहे व दुस–यावेळी अरुण अधिक शेळके याने सांगितले की, जाबदार या मुलासह तिच्या वडीलांकडे गेल्या आहेत. सदर बाब अर्जदाराच्या कथनास पुष्टी देतात की, जाबदार ही अरुण शेळके याच्यासोबत राहत आहे. या न्यायालयाने पाठविलेल्या वारंवार नोटीसीप्रमाणे व आदेशाप्रमाणे जाबदार नं. १ हिने न्यायालयात हजर राहण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा त्याआधारे प्रस्तुत अर्ज निर्णीत करण्यात येतो.

७. अर्जदार हे जाबदार नं. २ याचे वडील असल्याने व जाबदार नं. १ हिने पहिला विवाह अस्तीत्वात असताना दुसरा विवाह केला असल्याने व अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिला सदर दुस–या विवाहापासून तिला दोन अपत्ये झाली आहेत. अशा परिस्थितीत जाबदार नं. १ हि तिच्या दुस–या पतीवर अवलंबून आहे, त्यामुळे जाबदार नं. २ याच्या उज्वल भविष्याचा विचार करता व अर्जदार हा त्याचा जनक वडील असल्याने तो त्याचा सांभाळ व्यवस्थितरित्या करु शकेल. त्यामुळे अर्जदार हा जाबदार नं. २ चा ताबा मिळणेस हक्कदार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## **आदेश**

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.04.21 15:59:40 +0530

१. अर्जदारचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार याची जाबदार नं.२ मानवचा पालनकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येते व अर्जदार हा मानवचा कायमस्वरुपी ताबा मिळणेस पात्र आहे.

३. जाबदार नं.१ हिस आदेशीत करण्यात येते की, तिने जाबदार नं.२ मानवचा ताबा तात्काळ अर्जदार याच्याकडे दयावा.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात सांगून अधिघोषीत.)

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.04.21 15:59:47 +0530

इस्लामपूर (देविदास हरी केळूसकर)
दिनांकः २१/०४/२०२६ जिल्हा न्यायाधीश क्र.१ इस्लामपूर.